# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११ वे, राजपत्र क्र. ५१] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर १८-२४, २०२५ : अग्रहायण/पौष २७-३, शके १९४७ [पृष्ठे - १०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका



| | पृष्ठे |
|---|---|
| भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २७३५ ते २७३७ |
| संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले. | २७३८ ते २७४४ |
| भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | — ते — |



# शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**१**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून**
**नगर विकास विभाग**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- ०५/०९/२०२५**

**आदेश**

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :-***

**क्रमांक टिपीएस - ३०२४/२४०/प्र.क्र.८४/२०२४/नवि -३० :-** ज्याअर्थी, सिडको, वाळूज महानगर क्षेत्राची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३०००/४४८४/प्र.क्र. २३५ (ए)/२०००/नवि-३०, दि. १४/०८/२००१ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दि. ०१/१०/२००१ पासून अंमलात आली आहे. तसेच सिडको, वाळूज महानगर क्षेत्राची वगळलेल्या भागाची विकास योजना नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३००१/१४९८/प्र.क्र.२५८(ए)/२००१/नवि-३०, दि.२३/०७/२००२ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दि. १६/०९/२००२ पासून अंमलात आली आहे. (यापुढे “उक्त विकास योजना” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे तिसगांव, येथील ग. क्र. १८३ या जागेवरील २०.०० मी. रुंद “हरितपट्टा” (यापुढे “उक्त आरक्षण” असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांचे तत्कालिन समुचित प्राधिकरण सिडको, वाळूज महानगर, छत्रपती संभाजीनगर आहे. (यापुढे “उक्त समुचित प्राधिकरण” असा उल्लेख केला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणासंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वये दि. १०/०७/२०२४ रोजी सूचना बजावली आहे. (यापुढे “उक्त सूचना”असा उल्लेख केला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ (४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.४५०९/२०१७ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.१५/०९/२०२२ रोजी आदेश पारीत केले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन

संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) मधील तरतूदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन खालील परिशिष्टात नमुद केल्यानुसार, सिडको, वाळूज महानगर, छत्रपती संभाजीनगर विकास योजनेतील, मौजे तिसगाव येथील ग.क्र.१८३ या जागेवरील २०.०० मी. रुंद “हरितपट्टा”(सूचनाकर्त्यांच्या मालकीचे बाधीत क्षेत्र) खालील नमूद अटीच्या अधिन राहून, व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

**अटी**

***अट क्र. १*** *- सुचनाकर्ते यांनी त्यांचे सुचनेंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशामध्ये नमुद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहतील.*

***अट क्र. २*** *- सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमिन मालकांनी सुचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.*

**परिशिष्ट**

| अ.क्र. | गावाचे नांव, तालुका व जिल्हा | जमिनीचा सर्व्हे क्र./ गट क्र. | उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र | मंजूर विकास योजना मधील प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे तिसगांव, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | ग. क्र. १८३ (पै.) | सूचनाकर्त्यांच्या मालकीचे बाधीत क्षेत्र | २०.०० मी रुंद “हरितपट्टा” |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत महानगर आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

(प्रसाद रा. शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

---

**BY UNDER SECRETARY TO GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**URBAN DEVEOPMENT DEPARTMENT**

**MADAM KAMA MARG, HUTATMA RAJGURU CHOWK, MANTRALAYA, MUMBAI 400 032.**

**DATED : - 05/09/2025**

## ORDER

*The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 :*

**No. TPS - 3024/240/C.R.84/2024/UD - 30 :-** Whereas, the Development Plan of CIDCO,Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar, has been partly sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) ( hereinafter referred to as “ the said Act”) *vide* Notification No. TPS-3000/4484/CR-235(A)/2000/UD-30, dt.14/08/2001 and has come into force with effect from dt. 01/10/2001and Excluded Part of Development Plan of CIDCO, Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar, has been sanctioned by the Government under section 31 of the said Act *vide* Notification No. TPS-3001/1498/CR-258(A)/2001/ UD-30, dt.23/07/2002 and has come into force with effect from dt. 16/09/2002 (hereinafter referred to as “ the said Development Plan”);

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No. 183 (Part) of Mauje Tisgaon, Dist. Chhatrapati Sambhajinagar, (hereinafter referred to as “the said Land”) is reserved for 20m wide land designated as “Green Belt” (hereinafter referred to as “the said Reservations”);

And whereas, the CIDCO, Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar is erstwhile Appropriate Authority for the said Reservations. (hereinafter referred to as “the said Appropriate Authority”)

And whereas, the said Land has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

And whereas, the Owners of the said land, in reference to the Said Reservations, had served a notice dated 10/07/2014 under section 127(1) of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as “the said Notice”);

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126 (4) of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of said Notices under sub-section (1) of section 127 of the said Act;`

And whereas, the owners of the said Land have filed Writ Petition No. 4509/2017 before the Hon’ble Bombay High Court, Aurangabad Bench, and the final order is passed dated 15/09/2022 by the Hon’ble High Court;

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notices, nor Notification of land acquisition

required under section *126(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservation on the said Land stands lapsed as per the provisions of section *127(1)* of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservations 20m wide land designated as "Green Belt", as specified in the Sanctioned Development Plan of CIDCO Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar, stands lapsed bearing Gut No.183 (Part) of Mauje Tisgaon, Dist. Chhatrapati Sambhajinagar, subject to the following conditions and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

**CONDITIONS**

***Condition No. 1-*** *Since the notifier have not submitted an recent and certified Mojani Sheet of the said land, the noticer themselves will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding the area mentioned in the said order.*

***Condition No. 2-*** *Before authenticating the part plan in accordance with the said order, the concerned land owners will be required to submit a recent and certified Mojani Sheet of their proposed area from the Land Records Department to the concern Planning Authority.*

**ANNEXURE**

| Sr. No. | Name of the Village, Taluka and Dist. | Survey No./ Hissa No. | Area lapsed under section 127 *(2)* of the said Act | Reservation in sanctioned Development Plan |
|---|---|---|---|---|
| 1 | Mauje Tisgaon | Gut No. 183 (Part) | Area Affected owned by petitioners | 20m wide land designated as "Green Belt" |

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservations which have been lapsed *vide* this Order, will be available in the office of the Metropolitan Commissioner, Chhatrapati Sambhajinagar Metropolitan Region Development Authority, Chhatrapati Sambhajinagar during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts / Rules).

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

(Prasad R. Shinde)

**Under Secretary to Government**

-------------------------

२

# NOTIFICATION

**Law and Judiciary Department,**

**Hutatma Rajguru Chowk,**

**Madam Cama Road,**

**Mantralaya, Mumbai-400032**

**Date:- 18th March , 2025.**

**No.SPP.2025/U.O.R.21/D-XIV/:-** In exercise of the powers conferred by Rule 44 of the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions Of Service and Remuneration) Rules, 1984 and Section 32 of the Protection of Children from Sexual Offences Act 2012 (POCSO Act,2012); the Government of Maharashtra hereby appoints Adv. Ketan Jaidev Dhake as "Special Public Prosecutor" for conducting the case/s pending before Special Additional Sessions Court, Bhusaval, Dist. Jalgaon, which is/are arising out of C.R. No. 63/2025 registered at Muktainagar Police Station, Jalgaon.

2. The fees of Adv. Ketan Jaidev Dhake as "Special Public Prosecutor" shall be paid by Home Department.

3. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Condition Of Service and Remuneration) Rules,1984.

4. The Government reserves the right to revoke/modify/ annul the order without assigning any reasons.

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**(Vaishali P. Borude)**

**Section Officer, Law & Judiciary Department.**

-----------------------------

# संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

३

**उपजिल्हाधिकारी भूसंपादन छ. संभाजीनगर यांजकडून**

**अधिसुचना ११ (१)**

**१. भुसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ कलम**

**२. मा.जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश जा.क्र. २०२५/आरबीडेक्स-४/भूसंपादन/समन्वय/सिआर-४९ दिनांक ०३.०६.२०२५**

**जा.क्र.२०२५/भुसंपादन/जा.प्र./कावी-७२० :-** ज्याअर्थी भुमी संपादन पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०13 (३०चा २०1३) च्या कलम-३ मधील पोटकलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने, महसुल व वनविभाग अधिसुचना क्रमांक-११/२०१४/७७/-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिसुचना असा केला आहे) द्वारे भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०13 (२०13 चा ३०) (यापुढे याला सदरहु अधिसुचना संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करतांना सदरहू कायदयाच्या कलम ३ मधील पोटकलम (ए-झेड) नुसार जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसलेल्या शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, या अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणुन घोषीत करण्यात आले आहे. त्याअर्थी अनुसुची-१ मध्ये दर्शविलेल्या जमीनी (यापुढे त्यांचा उल्लेख "उक्त भुमी" असा करण्यात येईल) अनुसुची-२ मध्ये नमुद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरिता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांची समुचीत शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदरहू कायद्याच्या कलम -११ च्या पोटकलम (१) नुसार सार्वजनिक कामाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते, असे अधिसुचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सदरहू भुमी संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसुची-३ मध्ये नमुद केले आहे.

आणि ज्याअर्थी, भुमी संपादन कायद्यांतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसुची-४ मध्ये नमुद केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, भुमी संपादन कायद्याचे कलम ४३ पोटकलम (१) नुसार विस्थापिताचे पुनर्वसन आणि पुनःस्थापना करण्याकरिता सोबत जोडलेल्या अनुसुची-५ मध्ये प्रशासकाचे विवरण नमुद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसुची-५ मध्ये माहिती देणे आवश्यक आहे.)

त्याअर्थी, आता सदरहू कायद्याच्या कलम-११ चे पोटकलम (४) नुसार अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन सदरहू भुमी कायद्याच्या प्रकरण-४ खाली कार्यवाही पुर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उपत जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अश्या जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसुचित केलेल्या भुमीच्या मालकांने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट कलमाच्या अंमलबजावणी मधुन अशा भुमी मालकास सुट देऊ शकेल.

परंतू, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिकारी व्दारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदरहू भुमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूमीसंपादन पुनवर्सन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यापुढे ज्यांचा उल्लेख उक्त नियम असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उपनियम (३) अन्वये भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे कामी हाती घेतील.

आणि म्हणून त्याअर्थी समुचीत शासन म्हणून जिल्हाधिकारी सदरहू कायद्याचे कलम ३ पोटकलम (ग) अन्वये उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांना पदनिर्देशित करित आहे.

अनुसूची -१

**भूमी वर्णन :** मोजणी प्रमाणे

**गावाचे नाव :** मौजे काटेपिंपळगांव **ता.** गंगापूर **जि.** छत्रपती संभाजीनगर

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १९१, १९०, १८६, १८७, १८८, १८५, १८४, १८३, १७७ १७८, १७९,१५०,१५१, १५५,१५७, १५८,१५९, १६०, १६१,२५९,२५८, २७९,२७८,२७७,२७५, २८९,२८७, २९०,२९१, २९२,८०, ८१, ८२, ८३ ८४, १०४, १०५, १३२, १३३,१३४ ७८,७७, ७६, ७५, ७३, ६८/१, ७३, ७२, २६४, २६५ | १०.हे ९५ आर |
| | **एकुण** | **१० हे.९५ आर.** |
| | **सुधारित** | |
| **२.** | **१९१** | **० हे. १६ आर.** |
| | **एकुण** | **११ हे. ११ आर.** |

**संपादनाचे प्रयोजन :** नांदूर मधमेश्वर कालवा / शाखा कालवा क्र. २ वितरीका क्र. १ उपवितरीका क्रमांक ६ व ७ मौजे काटेपिंपळगांव ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०७/२०२१.

**अनुसूची -२**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण :-** या प्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

**प्रकल्पाचे नाव :-** नांदूर मधमेश्वर कालवा / शाखा कालवा क्र. २ वितरीका क्र. १ उपवितरीका क्रमांक ६ व ७ मौजे काटेपिंपळगांव ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०७/२०२१.

**प्रकल्पाच्या कामाचा तपशिल :-** नांदुर मधमेश्वर कालवा/शाखा कालवा क्रमांक २ वितरिका क्रमांक १ उपवितरिका क्रमांक ६ व ७ मौजे काटेपिंपळगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र.०७/२०२१

**सामाजिक फायदे :-** याप्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

**अनुसूची -३**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापनाच्या आवश्यकतेसाठी कारणे :-** विस्थापनाची आवश्यकता नाही.

**सबब माहिती :** निरंक

## अनुसूची - ४

सामजिक परिणामाचे निर्धारण गोषवारा :-

(सामाजिक परिणामाचे निर्धारण करणाऱ्या यंत्रणेने दिल्याप्रमाणे)

१. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३.०३.२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी प्रमाणे लागु करण्यापासुन सुट प्राप्त.

२.महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६.०४.२०१८ नुसार उक्त अधिनियमांचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त

## अनुसूची -५

१. नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती ज्या अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम :- आवश्यकता नाही.

२. सबब माहिती :- निरंक

३. प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता :- निरंक

प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसुचेनेनुसार झाली आहे त्याचा तपशील - निरंक

**टीप :-** उक्त जमिनीचा / जमिनीच्या योजनेचे (प्लॅनचे) निरीक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात करता येईल.

दिनांक : ०४/१२/२०२५.

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

**(एकनाथ कांता दत्तात्रय बंगाळे)**
उपजिल्हाधिकारी
भूंसपादन जायकवाडी प्रकल्प
छत्रपती संभाजीनगर

---

### ४

### जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर यांजकडून

### अधिसूचना

**क्रमांक २०२५/मशाका/जमाबंदी/कावि-७१०:-** शासकीय अधिसूचना महसूल व वनविभाग क्र. टीएलसी-१०७६/६३९२३/ दिनांक १ जुलै १९७६ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) च्या कलम ४ पोटकलम (१) च्या परंतुका खाली राज्य शासनास असलेले अधिकार मला प्रत्यायोजित करण्यात आलेले आहेत. त्यांचा वापर करुन मी दिलीप स्वामी, भा.प्र.से. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर, जी अधिसूचना काढण्याचे योजिले आहे. त्या अधिसूचनेचा पुढील मसुदा उक्त कलम४ पोटकलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जिचा परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तीच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

**अधिसुचनेचा मसुदा**

शासकीय अधिसूचना महसुल व वनविभाग क्र. टीएलसी-१०७६/६३९२३/ दिनांक १ जुलै १९७६ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ४ पोटकलम (१) च्या परंतूका अन्वये राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्योयाजित करण्यात आल्या आहेत. त्यांचा वापर करुन मी दिलीप स्वामी, भा.प्र.से. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर याद्वारे सिल्लोड तालुक्यातील सिल्लोड या गावातील खालील मुळ साझाचे नावाने ओळखण्यात येणाऱ्या गावाचे नवीन साझांचे महसूली गावात रुपांतरीत करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. | गावाची माहिती | मुळ महसुली गाव | विभाजनानंतर नव्याने तयार होणारे महसुली गाव | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सिल्लोड | सिल्लोड पूर्व | सिल्लोड दक्षिण | सिल्लोड उत्तर |
| १ | एकुण गट नंबर | ३८७ | १२० | १३६ | १३१ |
| २. | गावात येणारे गट नंबर | १ ते ३९१ | १ ते१०७, ३७२ ते ३८४ | १०८ते२३४ ३६९ते ३७१ ३८५ते ३९१ | २३५ते३५९ ३६०ते३६८ |
| ३. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | ३७४१.९८ | ११६८.७० | १०२८.८७ | १५४४.४१ |

स्थळ : छत्रपती संभाजीनगर

दिनांक : ११/१२/२०२५

**दिलीप स्वामी भा.प्र.से.**
जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.

---

### ५

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना, यांजकडून

### प्रारुप अधिसुचना

### महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४ (४) व ५ (२) अन्वये रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करणे बाबत.

**वाचा :-**

**१.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३, ४ व ५ (२) व त्या अंतर्गतचे नियम १९६७ मधील नियम ३ व नियम ४ मधील तरतुद.

**२.** महाराष्ट्र शासन अधिसुचना कृषि व सहकार विभाग, मंत्रालय मुंबई दि.०५ सप्टेंबर, १९८१.

**३.** मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. सीएमआर/३५/ॲक्ट/रुल्स/दि. १८/०९/१९८१.

**४.** रेशीम कोष अधिकारी, जालना यांचे पत्र जा.क्र. रेशीम/जालना / रेशीम को. बाजारपे/२०२४-२५/११२१ दि. ०८/१०/२०२४.

**५.** रेशीम कोष अधिकारी, जालना यांचे पत्र जा.क्र. रेशीम / जालना / रेशीम को. बाजारपे/२०२४-२५/२२४ दि. ०५/०६/२०२५.

**६.** सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांचे पत्र जा.क्र.१७३० दि.११/१०/२०२४.

**७.** प्रशासक, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांचे पत्र जा.क्र.१००७ दि. १२/०६/२०२५.

**८.** सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांचे पत्र जा.क्र.१०९६ दि. ३०/०६/२०२५.

**९.** या कार्यालयाचे पत्र जा.क्र. जिउनि/कृउबासजालना/रेशीमकोष बाजारपेठ/१३७८/२०२५ दि. १०/०७/२०२५.

**१०.** मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. पणन-५/कृउबासजालना/रेशीमकोष बाजारपेठ/६०२१/२०२५ दि. ०७/११/२०२५.

**जा.क्र. जिउनि/कृउबास जालना/रेशीमकोष बाजार आवार/अधिसुचना /२१७६/२०२५.–** ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे नियमन करण्याच्या उद्देशाची अधिसुचना काढणेबाबत व कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे बाजार क्षेत्रात नियमन करण्याची घोषणा करणे बाबत तरतुद आहे. तसेच कलम ५ मध्ये बाजाराची स्थापना करणेबाबत नमुद करण्यात आले आहे. कलम ५ (१) प्रत्येक बाजार क्षेत्रासाठी एक मुख्य बाजार स्थापन करण्यात येईल आणि एक किंवा अधिक दुय्यम बाजार स्थापन करण्यात येतील अशी तरतुद आहे. कलम ५ (१) मध्ये कलम ४ पोट कलम १ अन्वये अधिसुचना काढल्यांनतर शक्य तितक्या लवकर संचालक, शासकीय राजपत्रातील अधिसुचनेद्वारे, कोणत्याही बाजार क्षेत्रातील (कोणतीही बांधणी), परिवेष्ठीत जागा, खुली जागा किंवा स्थापन धरुन) कोणतीही जागा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीसाठी मुख्य बाजार म्हणुन स्थापन करील आणि त्यास त्याच अधिसुचनेद्वारे किंवा सदृश्य अधिसुचनेद्वारे, अशा कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीसाठी त्या-त्या बाजार क्षेत्रातील त्या सारख्या इतर कोणत्याही जागांमध्ये दुय्यम बाजार स्थापन करता येईल अशी तरतुद आहे.

ज्याअर्थी, वाचा क्रमांक ०२ शासन अधिसुचना व मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे वाचा क्रमांक ०३ चे परिपत्रकान्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३, मधील कलम ३, ४ व ५ (२) चे अधिकार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना प्रदान केलेले आहे.

ज्या अर्थी वाचा क्र. ०४ व ०५ अन्वये रेशीम विकास अधिकारी, जालना यांनी या कार्यालयास सिरसवाडी रोड इन्कम टॅक्स कार्यालयासमोर, राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत रेशीम कोष बाजारपेठ इमारतीची उभारणी केली आहे. सदर ठिकाणी रेशीम उत्पादक शेतकरी तसेच खरेदीदारास निवास, कोष साठविणे, कोष वाळविणे ई. सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत, नविन रेशीम कोष बाजारपेठ ईमारतीस रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करावे. तसेच या नविन ईमारतीमध्ये रेशीम कोषाची खरेदी विक्री करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ नुसार सदर नविन इमारतीस रेशीम कोष बाजारपेठ बाजारक्षेत्र घोषीत करुन त्याप्रमाणे बाजारक्षेत्राची अधिसुचना काढणे बाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी वाचा क्र.०६ अन्वये सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांनी दि.११/१०/२०२४ रोजी ठराव क्र.०६ पारीत करुन सिरसवाडी रोड ईन्कम टॅक्स कार्यालय, जालना समोरील रेशीम कोष इमारतीच्या परिसरास रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करण्याची विनंती केली आहे. तसेच वाचा क्र. ०७ अन्वये सदर बाबतीत दि.१२/०६/२०२५ रोजी ठराव क्र.०३ मंजुर करुन रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करण्याची विनंती केली आहे.

ज्या अर्थी वाचा क्र.०८ अन्वये सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांनी त्याचे कार्यालयास रेशीम कोष अधिकारी यांनी सादर केलेले बाजारपेठ इमारतीची चर्तुः सिमा, फेरफार उतारा, जमीन हस्तातरीत बाबत मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे आदेश, जमीन ताबा पावती, करारनामा, नगर परिषदेची बांधकाम मंजुरी, बांधकामाचा प्लॅन व नकाशा, शासन निर्णय व इमारत हस्तांतरण व ताबा पावती ई. कागदपत्रे या कार्यालयास सादर करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

ज्याअर्थी, वाचा क्र.०९ अन्वये या कार्यालयाने रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करण्याचा प्रस्ताव मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केला होता. त्यानुसार वाचा क्र. १० अन्वये मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ४ (४) नुसार राज्य शासनास, विशिष्ट कृषि उत्पन्नाच्या उलाढालीचा आणि त्यासाठी लागणाऱ्या विशेष पायाभूत सुविधांचा विचार करुन कोणत्याही क्षेत्रासाठी, विद्यमान बाजाराशिवाय विशेष वस्तुंचा बाजार राजपत्रातील अधिसुचनेद्वारे घोषीत करण्याची तरतुद आहे. तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीचा व बाजार घोषीत करण्याबाबतचा अधिकार संबधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना प्रदान करण्यात आलेले आहे. तसेच कृषि रेशीम कोष बाजारपेठ कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना येथे सुरु केल्यास जिल्हयातील शेतक-यांना त्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल. तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नातही वाढ होईल.

सबब सदरचे वैधानिक काम असल्याने धोरणात्मक निर्णय होवु शकत नाही त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना येथे नविन ईमारतीमध्ये रेशीम कोष बाजारपेठ सुरु करणेसाठी, त्यास बाजार क्षेत्र घोषीत करणेसाठी आपलेस्तरावरुन उचित कार्यवाही करावी असे नमुद केले आहे.

आणि, ज्याअर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४४ अन्वये या कार्यालयाने दि.०६/०६/२०२२ रोजी काढलेल्या अधिसुचनेत नियमन केलेल्या कृषि उत्पादित मालाचे यादीमध्ये अ.क्र.६९ वर रेशीम कोषाचे नावाचा समावेश आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे नियमन करण्याच्या उद्देशाची अधिसुचना काढणेबाबत व कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे बाजार क्षेत्रात नियमन करण्याची घोषणा करणे बाबत तरतुद आहे.

तसेच महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे ३ नुसार कलम ३ व ४ अन्वये अधिसुचना प्रसिध्द करावयाची रित नमुद असुन नियम ४ अन्वये हरकतीचा आणि सुचनांचा विचार करण्यासाठी चौकशी करण्याची कार्यरिती नमुद आहे.

त्याअर्थी, वरील नमुद बार्बीचा विचार करुन महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ यांतील कलम ३ व ४ (४) व ५ (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अधिन राहुन मी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना हे जाहीर करीत आहे की, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना जिल्हा जालना यांचे कार्यक्षेत्रात

असलेल्या सिरसवाडी ता. जि. जालना येथील रेशीमकोष बाजारपेठ, नवीन ईमारत सिरसवाडी रोड स.नं. ४८८ मधील १.०० हेक्टर जमीन, सिरसवाडी रोड, ईन्कम टॅक्स कार्यालय, जालना समोरील इमारतीचा परिसर, खुल्या जागा यासहीत म्हणुन रेशीम या विशेष पिकाचा कृषि उत्पन्न बाजार समिती जालना अंतर्गत विशेष रेशीम कोष बाजार आवार म्हणुन घोषीत करण्यात येवुन महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे नियम ३ व ४ चा अवलंब करुन अधिसुचनेची प्रसिध्दी व त्यावरील सुचना व हरकती बोलावण्यात याव्यात, या निर्णयाप्रत मी आलो आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना अंतर्गत प्रस्तावीत विशेष रेशीमकोष बाजार आवार नवीन ईमारत सिरसवाडी रोड, स.नं. ४८८ ता. जि. जालना या बाजारपेठचे क्षेत्र १.०० हेक्टर जमीनीच्या चतुः सिमा खालीलप्रमाणेः-

पुर्वेस :- १८ मीटर रुंद रस्ता व आग्नेय दिशेला मंदीर

पश्चिमेस :- स.न.४८८ मधील अतिक्रमीत जागा

उत्तरेस :- सिरसवाडी रस्ता, आयकर कार्यालय व रेल्वे लाईन

दक्षिणेस :- नाला व स.न. ४८८ चा उर्वरीत भाग

ज्याअर्थी, जालना कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रांतर्गत सिरसवाडी ता. जि. जालना येथील रेशीमकोष बाजारपेठ नवीन ईमारत, सिरसवाडी रोड, स.नं. ४८८ मधील १.०० हेक्टर जमीन सिरसवाडी रोड, ईन्कम टॅक्स कार्यालय, जालना समोरील इमारतीचा परिसर जागा खुल्या जागा सहीत क्षेत्रास महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदीनुसार शेतक-यांच्या सोयीसाठी रेशीम या अधिसुचित शेतीमालाची खरेदी विक्रीचे नियमन करण्यात येईल. तसेच या विशेष रेशीम कोष बाजार आवाराचा उपयोग रेशीम उत्पादन, कोष, कच्चा रेशीम आणि इतर संबंधीत विशेष कृषि उत्पादने यांच्या विक्री, खरेदी, भंडारण आणि प्रसंस्करणासाठी प्रायोजित केला जाईल. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७, वेळोवेळी निर्गमित परिपत्रकीय सुचना- व कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांच्या उपविधीतील तरतुदीनुसार उक्त विशेष रेशीम कोष बाजार आवाराचे व्यवस्थापन आणि विनियमन केले जाईल. त्या बाबत आक्षेप असल्यास सबंधितांचे आक्षेप वा हरकती मागविणे करिता हे कार्यालय आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी पुढील प्रमाणे प्रारुप अधिसुचना मसुदा जाहिर प्रसिध्द करित आहे.

**-: प्रारुप अधिसुचना :-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३ व ४ (४) व ५ (२) अन्वये या अधिसुचनेद्वारे जाहिर करण्यांत येते की, उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना बाजार समितीने सिरसवाडी ता. जि. जालना येथील विशेष रेशीमकोष बाजारपेठ नवीन ईमारत, सिरसवाडी रोड येथे शेतक-यांच्या सोयीसाठी रेशीम या विशेष शेतीपिकाचे खरेदी व विक्रीसाठी विशेष रेशीम कोष बाजार घोषित करुन चालु करणे बाबत प्रशासकीय सभा दिनांक १२/०६/२०२५ मधील ठराव क्रं. ३ समंत केलेला आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना जिल्हा जालना यांचे कार्यक्षेत्रात असलेल्या सिरसवाडी ता. जि. जालना येथील रेशीमकोष बाजारपेठ, नवीन ईमारत, सिरसवाडी रोड, स.नं. ४८८ मधील १.०० हेक्टर जमीन सिरसवाडी रोड, ईन्कम टॅक्स कार्यालय, जालना समोरील इमारतीचा परिसर जागा खुल्या जागा सहीत कृषि उत्पन्न बाजार समिती, जालनाचा रेशीम या विशेष कृषि उत्पन्नाचा विशेष रेशीम कोष बाजारपेठ घोषीत करण्यात येत आहे. या घोषीत रेशीम कोष बाजारपेठ क्षेत्राचा उपयोग महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदीनुसार अधिसुचित केलेल्या रेशीम उत्पादन, कोष, कच्चा रेशीम, आणि इतर संबंधीत उत्पादने यांच्या विक्री, खरेदी, भंडारण आणि प्रसंस्करणासाठी केला जाईल आणि महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील १९६७ चे नियम, वेळोवेळी निर्गमित परिपत्रकीय सुचना व कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांच्या उपविधीतील तरतुदीनुसार उक्त विशेष रेशीम कोष विशेष बाजार आवाराचे व्यवस्थापन आणि विनियमन केले जाईल. याबद्दल कोणाचे आक्षेप, हरकत असल्यास ते कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून पस्तीस (३५) दिवसात या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावेत, पसतीस दिवसा नंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाही.

कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना अंतर्गत प्रस्तावीत रेशीमकोष बाजार आवार नवीन ईमारत, सिरसवाडी रोड, स.नं. ४८८ ता.जि. जालना या बाजारपेठचे क्षेत्र १.०० हेक्टर जमीनीच्या चतुः सिमा खालीलप्रमाणेः-

पुर्वेस :- १८ मीटर रुंद रस्ता व आग्नेय दिशेला मंदीर

पश्चिमेस :- स.न. ४८८ मधील अतिक्रमीत जागा

उत्तरेस : - सिरसवाडी रस्ता, आयकर कार्यालय व रेल्वे लाईन

दक्षिणेस :- नाला व स.न. ४८८ चा उर्वरीत भाग

प्राप्त हरकती व सुचना याचा विचार करुन उक्त विशेष रेशीम कोष बाजार क्षेत्र कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांचे बाजार क्षेत्रात अधिकारात देण्यात येईल.

दिनांक :- १५/१२/२०२५

ठिकाण :- जालना

**(स्वाक्षरीत/-)**
**(संजयकुमार बोराडे)**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना.**

**६**

**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) जा.प्र.क्र.०४, अंबाजोगाई यांजकडून**

**भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम ११ नुसार**

**अधिसुचना**

**दिनांक -२०/११/२०२५**

**क्र.२०२५/एलएनक्यु/एसआर/३५/२००५.–** ज्याअर्थी,महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाची अधिसुचना क्र.मिस/**११/२०१४/सीआर/७७/अ२ दिनांक १९ जानेवारी २०१५** (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल )भुमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ३ पोटकलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन असे अधिसुचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३(झअ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत ५०० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास सदर जिल्हयाचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल.

त्या अर्थी,सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, बीड हे समुचित शासन आहे. त्या अर्थी,परिशिष्ट १ मध्ये नमुद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासु शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी,परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी,परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी,परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उपकलम (४) अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पुर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती,प्राथमिक अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर नाही किंवा कोणताही व्यवहार/हस्तांतर करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने,या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकल (५) व भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे कलम १० उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहीत करण्यात येईल त्याप्रमाणे भुमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.आणि ज्या अर्थी,सदर कायद्याचे कलम ३ उपकलम ग) अन्वये जिल्हाधिकारी,बीड हे समुचित शासन असल्याने उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) जा.प्र.क्र.०४ बीड मु. अंबाजोगाई यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट १ जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव :-पाझर तलाव क्र.०४ कुसळवाडी ता. अंबाजोगाई जिल्हा:- बीड**

| **अ.क्र.** | **स.नं./ग.नं.** | **क्षेत्र (हे.आर)** |
|---|---|---|
| १. | १५६९ | ०.१९ |
| २. | १५५५/अ | ०.४० |
| ३. | ब | ०.३८ |
| ४. | १५७०/अ | ०.०६ |
| ५. | ब | ०.२४ |
| | **एकुण** | **१.२७** |

**परिशिष्ट २**

प्रकल्पाचे नांव :- **पाझर तलाव क्र.०४ कुसळवाडी ता. अंबाजोगाई जिल्हा:- बीड**

प्रकल्पाचे विवरण:- **पाझर तलाव क्र.०४ कुसळवाडी ता. अंबाजोगाई जिल्हा:- बीड**

सामाजिक फायदे :- जलसंधारण

(,आर्थिक,रोजगार व इतर फायदे )

**परिशिष्ट ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण**

**गावाचे नांव :- पाझर तलाव क्र.०४ कुसळवाडी ता. अंबाजोगाई जिल्हा:- बीड**

| **अ.क्र.** | **स.नं./ग.नं.** | **क्षेत्र (हे.आर )** |
|---|---|---|

**लागु नाही.**

**परिशिष्ट ४**

**अनुसूची- चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.**

**टीप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे** उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) जा.प्र.क्र.०४ बीड मु. अंबाजोगाई **यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.**

**परिशिष्ट ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

१) प्रशासकाचे पदनाम :- लागू नाही

२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :- लागू नाही.

३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमुद करावे:-

लागू नाही.

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम (१) खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)जा.प्र.क्र.०४ बीड मु. अंबाजोगाई यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

दिनांक :२०/११/२०२५

ठिकाण : बीड

**(सुनिल शेरखाने)**
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)
जा.प्र.क्र.०४ बीड मु. अंबाजोगाई.

---

**७**

**उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर, यांजकडून**

**जा.क्र. २०२५/भूसं/विमानतळ विस्तारीकरण/सीआर-१/२०२५**
**दिनांक : १६.१२.२०२५**

**शुध्दीपत्र**

उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाने औरंगाबाद विमानतळ विस्तारीकरणासाठी मौजे चिकलठाणा, मुकुंदवाडी व मुर्तूजापूर येथील भूसंपादनाची प्रारंभिक अधिसूचना भूसंपादन, पुर्नवसन व पुनःस्थापना करतानं वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम ११ (१), नुसार महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-एक छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी राजपत्र क्र. ०३ गुरूवार ते बुधवार जानेवारी १६ ते २२, २०२५ मध्ये पृष्ठ क्रमांक ६२,६३ व ६४ वर प्रसिध्द केली आहे. सदर अधिसुचनेत खालीलप्रमाणे दुरूस्ती वाचावी.

**अनुसूची**

**मौजे : चिकलठाणा, ता.जि. छत्रपती संभाजीनगर**

**करिता**

| **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **क्षेत्र . हे.आर** |
|---|---|---|
| १ | ३८८ | ०.५०८४ |
| २ | ३९६ | १.१३७५ |
| ६ | ३९९ | १.४८८९ |
| ९ | ४०२ | ४.४५०० |
| ११ | ४०० | ०.४९४३ |
| ३२ | ५३३/१ | २.५८०० |
| ३३ | ५०८ | १.६५०० |
| ३४ | ५३५ | २.५००० |
| ३७ | ५३८ | ०.५१०० |
| ४४ | ७४८ | ०.२८५० |
| **एकुण अधिसुचित क्षेत्र करिता** | | **४८.४२३४** |

**वाचावे**

| **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **क्षेत्र हे.आर** |
|---|---|---|
| १ | ३८८ | ०.५१२४ |
| २ | ३९६ | १.१७३५ |
| ६ | ३९९ | १.५१८७ |
| ९ | ४०२ | ४.२००० |
| ११ | ४०० | ०.४२९३ |
| ३२ | ५३३/१ | २.५९०० |
| ३३ | ५०८ | १.५९०० |
| ३४ | ५३५ | २.२९०० |
| ३७ | ५३८ | ०.२४०० |
| ४४ | ७४८ | वगळले |
| **एकुण अधिसुचित क्षेत्र करिता** | | **४७.३६३२** |

**मौजे : मूर्तुजापूर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर**

**करिता**

| **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **क्षेत्र . हे.आर** |
|---|---|---|
| १ | ३४ | ०.६७४३ |
| **एकुण अधिसुचित क्षेत्र करिता** | | **४.२५४३** |

**वाचावे**

| **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **क्षेत्र हे.आर** |
|---|---|---|
| १ | ३४ | ०.६९४३ |
| **एकुण अधिसुचित क्षेत्र करिता** | | **४.२७४३** |

**मौजे : मुकुंदवाडी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर**

| करिता | | | वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **क्षेत्र . हे.आर** | **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **क्षेत्र हे.आर** |
| १ | १३ | ०.४४०० | १ | १३ | ०.४९०० |
| **एकुण अधिसुचित क्षेत्र करिता** | | **२.४२४३** | **एकुण अधिसुचित क्षेत्र करिता** | | **२.४७४३** |

**(डॉ. व्यंकट कंठीराम राठोड)**
**उप विभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.**

---

८

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, जिंतूर यांजकडून**

**अधिसूचना**

**जा क्र सनिव/कक्ष-३/श्रीस्वासमनासपत/नोंदणी/२०२५/७२५ :-** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. जिंतुर जि.परभणी याद्वारे अधिसूचित करीत आहे की, **श्री स्वामी समर्थ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. जिंतूर ता. जिंतूर, जि. परभणी** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील सन १९६१ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आलेली आहे.

जिचा नोंदणी क्रमांक पिबीएन/जेएनआर/आरएसआर/१५२४/२०२५-२६, दिनांक ०९/१२/२०२५ असा आहे.

उपरिनिदीष्ट अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्थाचे नियम १९६१ मधील नियम क्रमांक १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण - **साधन संपत्ती संस्था** उपवर्गीकरण - **कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था** आहे.

दिनांक - ०९/१२/२०२५

ठिकाण - जिंतूर

**(संजय व्ही. अब्दागिरे),**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, ता. जिंतूर.**

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.